नागपूर, शनिवार ३१ मार्च २००७

# विदर्भात वास्तुशास्त्र प्रशिक्षण मिळणार

**नागपूर-** सुमारे 14 हजारपेक्षा अधिक घरांमधील दोष काढून लोकांना दिलासा देणाऱ्या डॉ. रविराज अहीरराव व मंजुश्री रविराज अहिरराव विदर्भात वास्तुशास्त्र प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करीत असल्याची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली. ते म्हणाले, नागपूर, अमरावती, यवतमाळ, अकोला येथे हे अभ्यासक्रम सुरू करणार आहोत. कुठल्याही वास्तूत तोडफोड न करता तज्ज्ञ मार्गदर्शनाने अनेकांना लाभ झाला आहे. हेच मार्गदर्शन प्रशिक्षणाच्या रूपात मिळाल्यास नवोदितांना त्याचा खूप लाभ मिळू शकतो. हा उदात्त हेतू समोर ठेवत आपण महाराष्ट्रात वास्तुशास्त्र एज्युकेशन रिसर्च फाऊंडेशन ठाणे यांच्या वतीने वास्तुशास्त्र अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, आतापर्यंत 1500 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी हे प्रशिक्षण प्राप्त केले आहे. विशेष म्हणजे नोव्हेंबर 2005 मध्ये हैदराबाद येथे सर्वोत्तम वास्तुशास्त्र प्रशिक्षण संस्था म्हणून वास्तुशास्त्र एज्युकेशन रिसर्च फाऊंडेशन ठाणेचा गौरव करण्यात आला आहे. अभ्यासक्रमाची मांडणी अत्यंत सखोल पद्धतीने करण्यात आली आहे. यातून प्रशिक्षणार्थींना वास्तुशास्त्राचा अमुल्य ठेवा प्राप्त होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, हा अभ्यासक्रम करण्यासाठी कुठल्याही वयाची अट नाही.

**वास्तुतज्ज्ञ तयार करण्याचे स्वप्न**

कमीतकमी शैक्षणिक पात्रता इयत्ता दहावी किंवा त्यापेक्षा अधिक असावी. ज्यांना वास्तुशास्त्र विषयात रुची असेल त्यांनी हा अभ्यासक्रम केल्यास त्यांना खूप लाभ होईल. याशिवाय डॉ. रविराज अहिरराव वास्तुशास्त्रविषयक माहितीपर मनोरंजक दोन अंकी कार्यक्रमसुद्धा सादर करतात. शुक्रवारला हा कार्यक्रम पं. वसंतराव देशपांडे सभागृहात पार पडला. यावेळी प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. वास्तुशास्त्र मार्गदर्शन, वास्तुशास्त्र प्रशिक्षण, वास्तुदोष निराकरण वस्तूंचे उत्पादन आणि व्यावसायिक यशासाठी वास्तुशास्त्र यासंबंधात डॉ. रविराज अहिरराव कार्यरत आहेत.

लोकसत्ता
नागपूर, शनिवार, ३१ मार्च २००७

# विदर्भाच्या ४ शहरात वास्तूशास्त्र मार्गदर्शन

**नागपूर, ३० मार्च / प्रतिनिधी**

नवीन पिढीमध्ये ज्योतिष्य शास्त्रासोबतच वास्तूशास्त्राचा अभ्यास व त्यात आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने विदर्भात वास्तूशास्त्र मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. रविराज वास्तू स्पिरिच्युअल सर्व्हिसेस व वास्तू एज्युकेशन रिसर्च फाऊंडेशनचे संस्थापक डॉ. रविराज अहिरराव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. रविराज अहिररराव व मंजुश्री अहिरराव 'वास्तुरविराज' या कार्यक्रमाच्या निमित्ताने नागपुरात आले असता ते पत्रकाराशी बोलत होते. विदर्भात येत्या १५ दिवसात यवतमाळ, अमरावती, अकोला व नागपूर या ठिकाणी संस्थेच्या शाखा उघडण्यात येणार असून या विषयातील तज्ज्ञ प्रशिक्षण देणार आहेत. वास्तूरविराज या कार्यक्रमातून पौराणिक, वैज्ञानिक, रोजच्या जीवनातील कारण मिमांसा, वास्तू शास्त्रासंबंधी लोकांचे गैरसमज दूर केले जात असल्याचे अहिरराव यांनी सांगितले.

नागपुरात होणारा हा ५२ वा प्रयोग आहे. दिवसेंदिवस या कार्यक्रमाकडे लोकांचा पाहण्याचा दृष्टीकोण बदलत आहे. वास्तू शास्त्राबाबत अनेक लोक आपल्या शंकांचे निरासन करतात, असेही त्यांनी सांगितले. मुंबई, पुणे, येथे तीसपेक्षा अधिक कार्यशाळा घेण्यात आल्या असून त्यातून अनेक विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. दृक श्राव्यपद्धतीने हा अभ्यासक्रम शिकविला जातो. कुठलीही वास्तू बांधताना ती शास्त्रानुसार बांधली गेली पाहिजे असेही अहिरराव म्हणाले. ज्योतिष्य शास्त्राचा अभ्यास करणारे बरेच आहेत त्यामुळे वास्तूशास्त्र हासुद्धा स्वतंत्र विषय होऊ शकतो म्हणून १३ वर्षापूर्वी रविराज वास्तू स्पिरिच्युअल सर्व्हिस व वास्तू एज्युकेशन फाऊंडेशन ही संस्था त्यांनी सुरू केली. आतापर्यंत १४ हजारापेक्षा अधिक वास्तूंसाठी त्यांनी मार्गदर्शन व उपाययोजना सांगितल्या आहेत. त्यात वास्तव्य व व्यवसाय करणाऱ्या लोकांना खूप चांगले आरोग्य मिळवून देण्यात यश प्राप्त केले आहे. संस्थेचे कार्यालय पुणे आणि ठाणे येथे आहे. आज वास्तूशास्त्राचे मोठे वैशिष्ट्य म्हणजे कुठल्याही वास्तूमध्ये विनातोडफोड उपाययोजनांच्या माध्यमातून वास्तुदोष निवारण केले जाते. संस्थेने सहा महिन्याचे अभ्यासक्रम सुरू केले असून त्यात वास्तूशास्त्राचा सखोल अभ्यासक्रम, विनातोडफोड उपाययोजनांच्या प्रशिक्षणासह केस स्टडीज व प्रोजेक्ट रिपोर्टच्या माध्यमातून परिपूर्ण वास्तू कशी तयार केली जाते याचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे अहिरराव यांनी सांगितले. ■